# विमा सामाजिक सुरक्षिततेचे साधन : संजय कुचकर

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

**तासगाव :** धावपळीच्या जीवनपद्धती मध्ये जगताना विमा कवच घ्यावे. विमा सामाजिक सुरक्षिततेचे साधन आहे असे उद्गार संजय कुचकर यांनी पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव. येथे वाणिज्य विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या वाणिज्य मंडळाचे उद्घाटन प्रसंगी बोलताना काढले. यावेळी श्री. धोपटे साहेब यांनी एलआयसी चे महत्त्व सांगितले. तसेच वाणिज्य मंडळाच्यावतीने श्री.दिपक जाधव (चिंचणी) यांच्या आधुनिक शेतीची माहिती घेण्यासाठी विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट आयोजित केली होती.

अध्यक्षस्थानावरून बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे म्हणाले, अर्थव्यवस्थेमध्ये वाणिज्य क्षेत्राला खूप महत्त्व आहे. वाणिज्य मंडळाच्या माध्यमातून विद्यार्थी केंद्रीत विविध उपक्रम राबवावेत असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.डॉ.अमोल सोनवले यांनी केले. तर आभार प्रा. जी.आर.पाटील यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. स्वाती झांबरे हिने केले. याप्रसंगी प्रा.प्राजक्ता साळुंखे, प्रा.प्रतिक्षा चव्हाण व वाणिज्य विभागाचे विद्यार्थी - विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**तासगाव : वाणिज्य मंडळाचे उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना श्री संजय कुचकर, प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.डॉ.अमोल सोनवले व इतर**